प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

नोव्हेंबर 27, 2018

**दि उरवाकोंडा को-ऑपरेटिव टाऊन बँक लि., उरवाकोंडा, आंध्रप्रदेश, हयांचेवर आर्थिक दंड लागु**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम 46(4) सह वाचित कलम 47अ (1)(क) खाली देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व बँकेने, दि उरवाकोंडा को-ऑपरेटिव टाऊन बँक लि., उरवाकोंडा, आंध्रप्रदेश, हयांचेवर रु.2.00 लाख (रुपये दोन लाख) दंड लागु केला असून, तो दंड, केवायसी निर्देशांचे उल्लंघन करणे, अहवाल सादर न करणे, आणि अनुपालन अहवाल सादर न करणे/चुकीचा सादर करणे हयासाठी लावण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व बँकेने, वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती व त्यावर त्या बँकेने तिचे लेखी उत्तर सादर केले होते.  हया प्रकरणातील सत्य, बँकेने दिलेले उत्तर व वैय्यक्तिक सुनावणी विचारात घेऊन रिझर्व बँकेने निष्कर्ष काढला की उल्लंघने झाल्याचे सिध्द होत असून त्यासाठी दंड लावणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2018-2019/1214**